# आ. सुरेश धस वाल्मिक कराडाचा मुख्यधिकारी निता अंधारे गणेश पगारेना आशीर्वाद?


MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

आरंभ

संपादक - दिपक थोरात


बीड /प्रतिनिधी

२०० कोटीच्या भ्रष्टाचाराने बरबटलेल्या बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारी निंता अंधारे अकाउटट गणेश पगारेंनी बीड नगरपरिषदेतील स्वच्छता कर्मचारी नोकरी घोटाळ्यामध्ये सुद्धा आपला हातभार लावलेला आहे? असंच म्हणायला हरकत नाही बीड नगर परिषदेवर क्षिरसागर यांची एक हत्ती पस्तीस वर्षाची सत्ता आणि त्या सत्तेला  अनेक राजकीय नेतेमंडळींनी विरोध केला  असताना मात्र मुखधिकारी नीता अंधारे गणेश पगारेनी सुरुंग लावलेला आहे. क्षीरसागर यांच्या सत्तेला सुरुंग लावण्यामध्ये मुखधिकारी नीता अंधारे अकाउटट गणेश पगारे हे यशस्वी झाले म्हणायला हरकत नाही. बीड नगरपालिकेत  गेल्या दोन ते तीन वर्षापासून प्रशासक लक्ष देत आहे. बीडचेन. प प्रशासक यांनी बीड नगरपरिषदेवरचे प्रशासक म्हणून नियुक्ती झालेली असताना मात्र न. प प्रशासन दुर्लक्ष करत आहे. अक्षरशा बीड नगरपालिका अंतर्गत बोगस बिलांचा सुळसुळाट झालेला असून यावर कोणाचेही नियंत्रण नाही का मुखधिकारी नीता अंधारे गणेश पगारे यांना बीड शहरातील एकही नेता आवर घालणारा नाही का बीड शहराच वाटोळं होत असताना एकाही राजकीय नेत्यांमध्ये क्षमता नाही का असा    बीडच्या नागरिकांना प्रश्न पडलेला आहे. मुख्याधिकारी असलेल्या नीता अंधारे आणि अकाउंटंट चा चार्ज असलेला गणेश पगारे त्यांच्यासोबत काही कथित लोक आहेत.


| बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -१५२ | रविवार दि.१६ फेब्रुवारी २०२५ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -152 | SUNDAY DT.16 FEBRUARY 2025 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4 |


# प्रशासक कविता जाधव मॅडम मीडियासमोर सिओ निंता अंधारेकडून  बीड नगरपरिषदच्या २०२२/२३/२४/२०२५ पर्यंत आढावा घ्याल का?

## बीड नगर परिषदेत कित्येक काम अशी आहेत की त्याला ठरावा सुद्धा नाही आतापर्यंत दिलेल्या अनेक प्रशासकीय मान्यतेचे कामे किती झाली आणि किती काम न करताच पंचविस टक्के सिओ नीता अंधारेना तर गणेश पगारेना दहा टक्के कोट्यावधी रुपयाची बोगस बिल प्रकरणी सखोल चौकशी प्रशासक कविता जाधव यानी करणे गरजेचे.?



### न.प प्रशासक कविता जाधव मॅडम मीडियासमोर सिओ निंता अंधारे गणेश कडून  बीड नगरपरिषदच्या २०२२/२३/ २०२५ पर्यंतचा आढावा घ्याल का?

### बोगस बिल देण्याची उल्लेखनीय कामगिरी म्हणून नीता अंधारे गणेश पगारे यांना पुरस्कार दिलाच पाहिजे?

### मी गुत्तेदारांकडून पैसे घेणार नाही मीच फाईल बनवणार आणि मीच बिल काढणार नीता अंधारे गणेश पगारेची खेळीचे चित्र प्रशासक कविता जाधव मॅडम आपण मिडियासमोर मांडणार का या प्रकरणाची न. प प्रशासक म्हणून आपण चौकशी करणार का?

### स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या नोकरी विकत घेणारे मोठ्या रॅकेट सक्रिय न. प प्रशासक कविता जाधव यांनी या प्रकरणाकडे लक्ष घालणं गरजेचे?




की ते बीड नगर परिषदेमध्ये नंगानाच करून चालवत परिषद लूटण्याचं काम करत आहेत. बीड नगरपरिषद मध्ये नंगानाच चालू आहे. जनतेला माहित आहे. बीड शहरांमध्ये अनेक कामांची बोगस पद्धतीने बिल तयार करून त्याची  मुखधिकारी नीता अंधारे न पंचवीस टक्के तर गणेश पगारेला दहा टक्के तर उर्वरित गुत्तेदार व राजकीय नेत्यांना अशी त्या पैशांची विल्हेवाट लावली जात आहे. या सर्व कामाची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. बीड नगरपालिकेची निर्मिती ही बीड शहरातील जनतेच्या सेवेसाठीच करण्यात आलेली आहे का मुखधिकारी नीता अंधारे गणेश पगारे व गुत्तेदार राजकीय नेत्यांच्यासाठी करण्यात आलेला आहे. असा एक प्रश्न यावेळी नागरिकांना पडलेला आहे. बीड शहरातील नागरिकांना सर्व सुविधा आणि त्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी बीड नगरपालिका प्रशासनाकडून लोकहिताची कामे करणे अपेक्षित आहे. परंतु असं या ठिकाणी होत नाही. यासाठी शासनाने विविध योजनाही काढल्या असून त्या बीड नगरपरिषद मार्फत शहरांमध्ये विविध कामे केली जातात. ही कामे सगळे पारदर्शक होणे गरजेचे असून नागरिकांना याचा प्रत्यक्ष लाभ मिळाला पाहिजे. व अशी अपेक्षा असताना मात्र बीड नगरपालिका याला अपवाद ठरला आहे. मुख्याधिकारी निंता अंधारे गणेश पगारे यांनी एक हाती पदभार घेतल्यापासून गेल्या तीन वर्षांमध्ये नगरपालिकेत नुसता सावळा गोंधळ म्हणण्यापेक्षा भ्रष्टाचाराचा नंगानाच या ठिकाणी मुखधिकारी अंधारे अकाउंटंट गणेश पगारे यांच्याकडून चालू आहे एकदा झालेल्या कामाची तीन तीन चार चार वेळा बिल काढण्यात आलेले आहेत. बीड नगरपालिकेचे प्रचंड नुकसान झाले असून याचा थेट परिणाम बीड नगरपालिकेच्या सुखसुविधांवरती झालेला आहे. कोणत्याही वेळी कोणतीही गोष्ट बोगस पद्धतीने दिले उचलण्यासाठी सपाटा चालू आहे. हा सपाटाच्या मुखधिकारी निता अंधारे आणि अकाउंटंट गणेश पगार यांच्या घरूनच फाईलीवरती    सह्या चालू आहेत. गुत्तेदारी टक्केवारी वेगवेगळ्या बीड शहरातील योजना व वेगवेगळ्या विभागातील नगर परिषद मधील कोट्यावधी रुपयाचे टेंडर हे बोगस पद्धतीने बिल काढण्याचे काम २०२२/२३ /२०२४ /२५या वर्षात सुरू आहे. यावर कोणाचेच नियंत्रण नाही बीडचे राजकीय नेते ही सध्या मूग गिळून गप्पा आहेत. त्यातच बीड नगरपालिकेच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आले आहेत संबंधित बीड नगर परिषदेची बॉडी ही तयार नाही शासनाकडून उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांची बीड नगरपालिकेच्या प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे मात्र कविता जाधव यांचा बीड नगरपालिकेच्या कामांमध्ये प्रत्यक्ष सहभाग असल्याचे दिसून येत नाही. त्यांच्या परस्पर अनेक बोगस कामे बीड नगरपालिकेमार्फत केली जात आहेत नगरपालिकेतील सगळा पैसा चा खेळखंडोबा व उधळाउळीचा खेळ सुरू आहे. त्यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. यासाठी न. प. प्रशासक असलेल्या कविता जाधव यांनी बीड नगरपालिकेच्या कामांमध्ये लक्ष घालणं आवश्यक आहे. झालेल्या कामाची चौकशी करून दोषी अधिकारी कर्मचारी मुखधिकारी निंता अंधारे गणेश पगारे व वेगवेगळे बीड नगर परिषदेमधील गुत्तेदार व मोठे मासे यांच्यावर कारवाई होणे गरजेचे आहे. न. प प्रशासन कविता जाधव यांनी बीड नगरपालिका न. प प्रशासन आणि झालेल्या कामाची सखोल चौकशी करावी. मुख्याधिकारी निंता अंधारे गणेश पगारे यांच्या सोबत असलेले काही अधिकारी यामध्ये दोषी असल्याची चर्चा आहे. त्याची चौकशी करणे गरजेचे आहे. बीड नगरपालिकेच्या या भोगळ कारभाराबाबत अनेक कर्मचाऱ्यांवर तक्रारीसाठी आहे कर्मचाऱ्यांच्या विरोधात यापूर्वी तक्रारी झालेले आहेत यामध्ये मुखधिकारी नीता अंधारे अकाउटट गणेश पगार यांच्यावर प्रामुख्याने सर्वात जास्त तक्रारी आहेत. मात्र या तक्रारीची कुणी दखल घेत नसल्याचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे वरदहस्त लाभलेले राजकीय नेत्यांच्या दावणीला बांधलेले  मुखधिकारी निता अंधारे अकाउंटंट गणेश पगारे यांना न. प प्रशासन कविता जाधव यांनी अशा गैरप्रकारच्या कारभार नियंत्रण आणून न. प प्रशासन कविता जाधव यांनी प्रशासक पदाचा पदभार घेतल्यापासून विविध विभागात बीड नगर परिषदेमध्ये २०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे याची तपासणी करणे  गरजेचे आहे. व बीड शहरातील बीड नगर परिषद हद्दीमधील जनतेची होणारी हेळसांड थांबवून सुख सुविधा याकडे लक्ष दिले पाहिजे असे जनसामान्यातून मत व्यक्त होत आहे आहेत

बीड नगर परिषदेत नीता अंधारे गणेश पगारे यांना परळीहून वाल्मीक कराड तर अस्तित्व सुरेश धसाचा उघड आशीर्वाद?

बीड नगर परिषद मध्ये मुख्याधिकारी नीता अंधारे अकाउंटंट गणेश पगारे यांना बदली करून आणण्यात असताना मात्र अनेकांनी ताकद लावलेली आहे यातच मात्र मुख्याधिकारी नीता अंधारेची बदली असेल किंवा मुख्याधिकारी नीता अंधारी बद्दल तक्रार असेल बीड नगरपरिषद मार्फत झालेल्या कोट्यावधी रुपयाच्या भ्रष्टाचाराने २०० कोटी रूपाचा आकडा गाठलेला आहे. बीड नगर परिषदेमध्ये सफाई कामगारांच्या नोकरी विकण्याचं रॅकेट सक्रिय आहे. याला जबाबदार बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे व अकाउंटंट गणेश पगारे आहेत या दोघांनी स्वतःच्या परिवाराचं भलं करण्यासाठी स्वतःच्या नातेवाईकांना गुत्तेदारी दिलेली आहे. यातच गणेश पगारेला बीडला बदली करावी म्हणून आष्टीचे आमदार सुरेश धस यांनी शिफारस केलेली आहे. कमात्र परळीत होऊन एका नावाने फेमस असलेला बीड जिल्ह्याचा आकार वाल्मीक कराड व आष्टीचे आमदार सुरेश धस हे क्षीरसागर यांची सत्ता उलटून टाकण्यासाठी व वाल्मीक कराड सध्या जेलमध्ये असताना सुद्धा या ठिकाणी मुखधिकारी नीता अंधारेच्या माध्यमातून या अगोदर कोट्यावधी रुपयाचे बिल हे बोगस पद्धतीने केलेले आहेत. वाल्मीक कराड व सुरेश धस यांनी मुखधिकारी नीता अंधारे गणेश पगारे यांना पाठीशी घातलं व राजकीय वलय दिल्यामुळे म्हणून बीड नगर परिषदेमध्ये क्षीरसागर यांच्या सत्तेला सुरू लागलेला आहे तर बीड शहरातील जनतेला सुख सुविधा या मिळत नसल्यामुळे मुख्याधिकारी नीता अंधारे अकाउंटंट गणेश पगारेच्या पाठीशी राजकीय वरदहस्त असलेले आका या नावाने फेमस असलेले परळीचे वाल्मिक कराड ही आहे आहे कारण  यांची बदली असेल किंवा गणेश पगारेची बदली बीडला व्हावी म्हणून असेल तर आष्टीचे आमदार सुरेश धसानी बीड नगरपरिषद ते थेट मुंबई मंत्रालयापर्यंत आपला वशिला लावून मुख्याधिकारी नीता अंधारे व अकाउंटंट गणेश पगारे यांची बदली रद्द करण्यासाठी प्रयत्न केलेले आहे. नीता अंधारे गणेश पगारे हे मुंबई येथे मंत्रालय पातळीवर मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री नगर विकास मंत्री नगर विकास आयुक्त सचिव यांच्या कार्यालयापर्यंत सुरेश धस नीता अंधारे गणेश पगारे सोबत जाऊन बदली रद्द करण्यासाठी प्रयत्न केलेले आहेत अनेकदा मुख्याधिकारी नीता अंधारे गणेश पगारे यांनी बोलत असताना सुद्धा अनेकदा धस अण्णांचाउल्लेखही करत असल्याची अनेक नागरिकांच्या तोंडून चर्चेला उधाण येत आहे तर बीड नगर परिषदेमध्ये दररोज किती रुपये निधी कर म्हणून येतो आणि बोगस बिलाचा जातो या सर्वांची दररोज चा हिशोब म्हणजेच चौकशी ही वाल्मीक कराड ही करत होता मुख्याधिकारी नीता अंधारे गणेश पगारे आणि वाल्मीक कराडचे फोन कॉल डिटेल तपासले तर यामध्ये तीळ मात्र शंका येणार नाही व सर्व चित्र स्पष्ट होईल  अशी ही चर्चा वेळ नगर परिषदेमध्ये नागरिक व कर्मचाऱ्यांच्या तोंडून ऐकायला मिळत आहे

# गुरुदत्त विद्यालय चौसाळा येथे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा शुभचिंतन सोहळा संपन्न

**प्रतिनिधी । चौसाळा**

गुरुदत्त माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय चौसाळा येथे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यासाठी आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून चौसाळा चौकीचे जमादार आदरणीय खटाने साहेब व प्रमुख पाहुणे म्हणून पोलिस अधिकारी श्री मुरुमकर साहेब. तसेच संस्थेचे उपाध्यक्ष सयाजी (बाप्पा) शिंदे, शालेय समितीचे सदस्य संभाजी आबा जोगदंड,उमेश आंधळे, सामाजिक कार्यकर्ते शीकुर भाई सौदागर यांच्यासह विद्यार्थी पालक व शिक्षक वृंदाच्या उपस्थितीत संपन्न झाला. सर्व मान्यवरांच्या हस्ते सरस्वती प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांच्या वतीने शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांचा सत्कार करण्यात आला विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सुमित जाधव याने शाळेतील गोड आठवणी व शिक्षकांचे मार्गदर्शन याबाबत मनोगत व्यक्त केले. इयत्ता दहावीची विद्यार्थिनी कुमारी जोगदंड सानिका हिने. विद्यालयाच्या कुटुंबातून जाताना वाटणारी हुरहुर व्यक्त करत भविष्यात शाळेचा नावलौकिक होईल असे कर्तृत्व करून दाखवू अशी ग्वाही दिली. कु. तनुजा आंधळे कु. पूजा जाधव चि. श्रेयस जाधव यांनी शाळेतून सुसंस्काराची शिदोरी घेऊन जात असताना समाजात शाळेचा मान आणि सन्मान रखून स्वाभिमानी जगू असे विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री खाटणे साहेब यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असताना समाजात आजची तरुण पिढी भरकटत चालली आहे यावर प्रकाश टाकून विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून दूर राहून समाजात सर्व धर्म समभाव व जातीय सलोखा राखण्याचे आवाहन केले. शाळेतील शिक्षक श्री.लीमकर यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धेचे युगात टिकायचे असेल तर जिद्द आणि चिकाटी हवी अशी अपेक्षा व्यक्त केली. विद्यार्थी प्रिय शिक्षक श्री गुरव सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना



स्वतःच्या करिअरचा विचार करत असतानाच समाजाचे व आपल्या आई-वडिलांचे ही ऋण आपल्यावर आहे याची जाण ठेवण्याबाबत सल्ला विद्यार्थ्यांना दिला. शाळेचे मुख्याध्यापक आदरणीय श्रीमंत चौधरी सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना जीवनाच्या प्रवासातील आपले ध्येय निश्चित करा व व ध्येयाकडे वाटचाल करताना सल्ला देणारा मार्गदर्शन करणारा माणूस ओळखायला शिका कारण अर्जुनापेक्षा सामर्थ्यशाली असणाऱ्या दुर्योधनाचा सल्लागार शकुनी मामा होता. त्यामुळे दुर्योधनाचा सर्व नाश झाला आणि अर्जुनाने कृष्णाच्या मार्गदर्शनाखाली कर्तृत्व सिद्ध केले. असे हृदयस्पर्शी विचार व्यक्त करून विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता नववीच्या विद्यार्थिनी कुमारी अक्षरा भरणे व जोगदंड यांनी केले .शाळेतील ज्येष्ठ शिक्षक श्री केदार सर यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता नववीच्या वर्गाच्या वतीने मीष्ठांनं भोजनाचे नियोजन केले. दहावीच्या विद्यार्थ्यांच्या वतीने शाळेत दुपारची खिचडी बनवणाऱ्या श्रीमती पवार बाई यांना विद्यार्थ्यांनी भारतरत्न विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा भेट देऊन कार्याचागुणगौरव केला कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक श्री घोडके सर, श्री मोठे सर, श्रीमती साबणे मॅडम ,श्री राठोड सर ,श्री वैद्य सर शाळेतील सहकारी श्री बाळासाहेब जाधव, श्रीमती टाचतोडेबाई, श्री सोनवणे नाना, श्री धनंजय वाघमारे ,श्री विश्वनाथ पवार यांनी सहकार्य केले.

## लोकंहो, आमदार-खासदारांच्या बातम्या आलेली वृत्तपत्रे रद्दीत टाकू नका!

### सांभाळून ठेवा कालांतराने कामी येतील - एस.एम.युसूफ़

**प्रतिनिधी । बीड**



नवनिर्वाचित आमदार-खासदार अलीकडे बरीच विकास कामांची पत्रके वृत्तपत्रातून प्रसिद्धीसाठी देत आहेत. त्यांच्या बातम्या प्रकाशित झालेली वृत्तपत्रे वाचल्यानंतर लोकांनी कृपया रद्दीत टाकू नये. ती संग्रही ठेवावी. पुढे चालून ती कामी येणार आहेत असे प्रतिपादन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, बीड विधानसभा मतदारसंघातून दुसऱ्यांदा निवडून आलेले आमदार हे पहिल्या टर्म सारखेच दुसऱ्या टर्म मध्येही विविध विकास कामांची अंदाजित पत्रके प्रसिद्धी माध्यमातून प्रकाशित करण्यासाठी देत आहेत. ज्यात प्रामुख्याने बिंदुसरा नदीवरील खासबाग-मोमीनपुरा जोडणाऱ्या नियोजित पुलाच्या बातम्यांचाही समावेश आहे. गेल्या टर्म वेळी सुद्धा आमदारांनी या पुलाविषयी अशीच मोठी पत्रकबाजी केली होती परंतु त्यांचे पहिल्या टर्मचे पाच वर्षे संपले तरीही या पुलाचा मुहूर्त काही लागला नाही. आणि अद्याप पर्यंतही हा प्रश्न आहे तसाच पडून आहे.

याशिवाय पहिल्यांदा निवडून येणारे बीडचे खासदार सुद्धा अनेक विकास कामांसाठी विविध पत्रके काढत आहेत. ज्यात प्रामुख्याने अहेमदनगर-बीड-परळी रेल्वे मार्ग लवकरच पूर्ण होणार, इमामपूर रस्त्यावर रेल्वे थांबा मंजूर होणार, उस्मानाबाद-बीड-औरंगाबाद रेल्वे मार्ग होणार, सोलापूर-बीड-जळगाव रेल्वे मार्गही होणार इत्यादी दावे करीत आहेत. निवडून आलेल्या आपल्या बीडच्या या लोकप्रतिनिधींचे असे दावे केलेल्या बातम्या प्रकाशित झालेली वृत्तपत्रे लोकांनी सांभाळून ठेवावीत. अशा वृत्तपत्रांना रद्दीत टाकू नये. कारण पुढे काही वर्षांनी आमदार-खासदार करत असलेले दावे आणि विकास कामे पूर्णत्वास आली नाही तर पुढच्या निवडणुकीत ही वृत्तपत्रे दाखवून निदान आमदार-खासदारांना जाब विचारता येईल. असे प्रतिपादन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे.

# जोपर्यंत विमा भेटणार नाही, तोपर्यंत मागे हटणार नाही शेतकऱ्यांचा निर्धार

### पिकविमा कंपनीच्या कार्यालयासमोर १७ फेब्रुवारी पासून सुरू होणाऱ्या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे - कॉ. कृष्णा पा सोळंके

**प्रतिनिधी । माजलगांव**

सन २०२४ च्या खरीप हंगामातील विविध पिकांचा पिकविमा आपण सर्व शेतकऱ्यांनी एग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनीकडे भरला होता. मात्र यावर्षीच्या हंगामात सततचा पाऊस झाल्यामुळे शेतात पाणी साचून राहिले. यामुळे बऱ्याच ठिकाणची पिके पाण्यात गेली. त्याच्या वैयक्तिक तक्रारी पिक विमा कंपनीकडे शेतकऱ्यांनी केल्या. मात्र ९ सप्टेंबर रोजी जिल्हाभरातील बहुतांश महसूल मंडळात अतिवृष्टी होऊन पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. आणि या पीक नुकसानीच्या तक्रारीचे प्रमाण २५% च्या पुढे गेल्याने तरतुदीनुसार रँडम सर्वे करून व्यापक नुकसान झाल्याचे निदर्शनास आले. अशावेळी पिक विमा कंपनीने शेतकऱ्यांना तातडीचा दिलासा म्हणून २५% पिवविमा एग्रीम वितरित करण्याचे निर्देश पिकविमा प्रावधानात आहेत. त्यानुसार केवळ ६ लाख ५९ हजार सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनाच हे एग्रीम घोषित झाले; पण अद्याप पर्यंत मिळाले नाही. वास्तविक पाहता सर्वच पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असल्यामुळे सर्वच पिकांसाठी हे पिक विमा अग्रीम मिळणे अपेक्षित होते. असो. तसेच विविध टप्प्यावर नुकसान झालेल्या व त्या नुकसानाचे क्लेम केल्यापैकी २ लाख ४४ हजार शेतकरी नुकसान भरपाईस पात्र ठरुण ही विम्याचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाले नाहीत.

यासंदर्भात ४ फेब्रुवारी रोजी किसान सभेच्या शिष्टमंडळाने मा. जिल्हाधिकारी समक्ष जिल्हा



पिकविमा प्रतिनिधी यांच्याकडे या पिक विमा वितरणाची मागणी केली मात्र विमा कंपनी शासनाकडून शेतकरी हिस्स्याची रकम मिळाली नसल्याची सबब पुढे करून हे पिकविमा वितरण टाळत असल्याची बाब समोर आली. तसेच २०२३ चा रब्बी पिकविमा व २०२३ च्या रिव्यू झालेल्या तक्रारींची लॉगिनला दिसणारी पिक विम्याची रक्कम तात्काळ वितरित करण्यात यावी म्हणून अखिल भारतीय किसान सभेने सात फेब्रुवारी रोजी निवेदन देऊन पुढील दहा दिवसात या सर्व पीक विम्याचे वितरण करण्याची विनंती विमा कंपनीकडे केली आहे. असे जर झाले नाही तर १७ फेब्रुवारीपासून हजारो शेतकरी एग्रीकल्यर इन्शुरन्स कंपनी च्या बीड जिल्हा कार्यालयासमोर जोपर्यंत आपल्या खात्यावर विमा पडणार नाही तोपर्यंत बेमुदत धरणे देणार आहेत. या शेतकरी हीत हक्काच्या लढ्यात आपण हजारोच्या संख्येने उपस्थित व्हावे. असे आव्हान किसान सभेच्या वतीने करण्यात येत आहे.



## महसूल अधिकारी शैलेश जोगदंड यांचा वंचित बहुजन आघाडीने केला सत्कार

**प्रतिनिधी । बीड**

बीड तालुक्यातील शिदोड या गावातील शैलेश जोगदंड यांची चझडउ द्वारे घेण्यात आलेल्या परीक्षेत महसूल सहाय्यक पदी मंत्रालयामध्ये निवड झाल्याबद्दल आज वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, बीड शहराध्यक्ष लखन जोगदंड, मिलिंद सरपते, निकाळजे यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देत सत्कार करत पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या बीड तालुक्यातील सर्व स्तरातून अभिनंदन करून कौतुक होत आहे. स्पर्धा परीक्षा आणि त्यासाठी तयारी सामान्यतः कठीण व आव्हानात्मक असते. मात्र अनेक अडचणीवर मात करून संपूर्ण गावात आपल्या कुटुंबाचा परत एकदा सन्मान वाढवला आहे. या यशाबद्दल शिदोड गावासह संपूर्ण बीड तालुक्यातून त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.



मिलीया बॉईज हायस्कूलचे नवनिर्वाचित प्राचार्य पदी फैसल चाऊस यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करून अभिनंदन करताना मिलीया गर्ल्स हायस्कूलचे प्राचार्य इरफान सिद्दिकी समाजसेवक मुसाखान पठाण मोहसीन सर खमर नाझ. झाहेद कादरी व ईतर दिसत आहेत..

# पवनचक्की कंपन्यांचा मनमानी कारभार ; विनासहमती शेतातुन पवनचक्की उभारणी साहित्य

### वाहतुक केल्याबद्दल जिल्हाधिकारी, पोलिस अधिक्षकांना मुळुकवाडी येथील शेतकऱ्यांची तक्रार

**प्रतिनिधी । लिंबागणेश**

बीड तालुक्यातील बालाघाटावर पवन ऊर्जा प्रकल्प कंपन्या संच उभारताना नियम व अटींचे पालन करत नसुन मनमानी कारभार करत आहेत.त्यामुळे पवन ऊर्जा प्रकल्प संदर्भात जमीन खरेदी व्यवहारात गैरप्रकार तसेच संपादीत जमिनीपेक्षा जास्तीचे अतिक्रमण करणे, ठरलेला जमिनीचा मोबदला देण्यास टाळाटाळ करणे,कराराचे पालन न करणे आणि जाब विचारला असता शेतकऱ्यांना दमदाटी करणे आदी प्रकारच्या शेतकऱ्यांच्या तक्रारी वाढल्या आहेत.त्यातच आता शेतकऱ्यांच्या सहमती विना परवाना कोणाताही मोबदला न देताच शेत जमीनीमधुन गट क्रमांक ६५७ मधील ६२ आर शेतजमीनी मधुन रिन्यु ग्रीन एम.एच.पी.वन प्रायव्हेट लिमिटेड नवी दिल्ली ही कंपनी पवनचक्की उभारणी करत असुन कंपनीने दि.९ फेब्रुवारी पासून आमच्या शेत जमीनीमधुन माझ्या कुटुंबाच्या संहमतीशिवाय पवनचक्की प्रकल्प उभारण्यासाठी पोकलेन, जेसीबी, जीप,पिक अप अशा विविध वाहनांची वाहतूक करत असुन हे नियमबाह्य व माझ्या शेतजमीनीचे नुकसान करणारे आहे.त्यामुळे सदरील कंपनीस माझ्या शेतातुन




वाहतूक करण्यास प्रतिबंध करण्यात यावा अशी लेखी तक्रार रोहित सुरेश ढास यांनी जिल्हाधिकारी व पोलिस अधिक्षक बीड यांना केली आहे. पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभार विरोधात वारंवार तक्रारी येऊन सुद्धा उर्जा प्रकल्प संदर्भातील जिल्हा स्तरीय आणि तालुकास्तरीय संनियंत्रण समित्या केवळ कागदावरच असुन प्रत्यक्षात पिडीत शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यास असमर्थ असल्याची खंत सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग ऊर्जा आणि कामगार विभागाने दि.२१ ऑक्टोबर २०१३ रोजी पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय नियंत्रण समित्यांची स्थापना केलेली आहे. या समित्यांना पवन ऊर्जा प्रकल्पाशी निगडित असलेल्या जमिनीच्या व्यवहारांबाबत कायदेशीर बाबी व अनिश्चितता तपासणे तसेच पवन ऊर्जा प्रकल्पाशी निगडित असलेल्या जमिनीच्या व्यवहारांमध्ये योग्य व्यावहारिक व मोबदला मिळत असल्याबाबत खात्री करणे. पवन ऊर्जा प्रकल्पाबाबत समितीकडे आलेल्या तक्रारींची चौकशी करून त्यावर योग्य ती कारवाई करणे. आणि जिल्ह्यातील पवन ऊर्जा प्रकल्पांच्या अनुषंगाने उद्भवणाऱ्या अडचणींचे निराकरण करणे .त्याचप्रमाणे शेतजमिन मालक ,शेतकरी आणि ग्रामस्थ आणि प्रकल्प विकासक यांच्यामध्ये समन्वय ठेवणे. प्रकल्प उभारण्यासाठी व प्रकल्प कार्यरत राहण्यासाठी स्थानिक स्तरावरचे सर्व प्रकारचे सहाय्य करणे इत्यादी अधिकार यांना दिलेले आहेत. पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय संनियत्रण समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी आहेत तर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद आणि पोलीस अधीक्षक सदस्य आहेत त्याचप्रमाणे उपविभागीय स्तरावर असलेल्या सनियंत्रण समितीमध्ये उपविभागीय अधिकारी अध्यक्ष तर तहसीलदार समन्वयक अथवा सचिव आहेत .मात्र या समित्या केवळ कागदावर असून पवन ऊर्जा प्रकल्प संदर्भात शेतकऱ्यांच्या तक्रारीकडे जिल्हा प्रशासन जाणिवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप पिडीत शेतकरी करत आहेत.त्यामुळे कागदावरील समित्या प्रत्यक्षात उतरणे गरजेचे आहे असे मत सामाजिक कार्यकर्ते डॉक्टर यांनी व्यक्त केले आहे.

## प्राध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी शिवप्रेमी शिवजन्मोत्सव समितीच्या बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित राहा- प्रा. सत्येंद्र पाटील सर

**प्रतिनिधी । बीड**

शहरातील शिवप्रेमी प्राध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या वतीने शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या शिवजन्मोत्सवाच्या आयोजन आणि नियोजनाच्या निमित्ताने आज दि.१६ फेब्रुवारी रोजी बैठक आयोजित करण्यात आली आहे. तरि या बैठकीस बीड शहरातील शिवप्रेमी प्राध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन प्राध्यापक, शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचारी शिवप्रेमी शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष प्रा. सत्येंद्र पाटील सर यांनी केले.

बीड शहरात मागील काही वर्षांपासून शिवप्रेमी प्राध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव आगळ्या वेगळ्या पद्धतीने, विविध उपक्रमाने, व्याख्यान आणि प्रबोधनात्मक कार्यक्रमाने साजरा केला जातो. या वर्षी ही हा शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या शिवजन्मोत्सवाच्या आयोजन आणि नियोजनाच्या निमित्ताने आज रविवार दि. १६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५:३० वाजता स्वराज्य नगर भागातील रवींद्र किराणाच्या



पाठीमागे अमोल गलधर चौक येथील प्रा. सत्येंद्र पाटील यांच्या निवासस्थानी बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या बैठकीस बीड शहरातील प्राध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन प्राध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी शिवप्रेमी शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष प्रा. सत्येंद्र पाटील सर, यांच्यासह प्रा. चंद्रकांत मुळे सर, प्राचार्य विवेकजी मिरगणे सर, प्रा. पंजाब येडे सर, प्रा. राजेश मोराळे सर यांनी केले.


# उमापूर येथील जीर्ण विद्युत तारा बनल्या धोकादायक

### महावितरणचा अनागोंदी कारभार, नागरिकांच्या जीवावर बेतणार; तारा बदलण्याकडे अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

**प्रतिनिधी । गेवराई**

उमापूर परिसरामध्ये विद्युत तारा जुन्या झालेल्या असतांनाही येथील अधिकारी कर्मचार्यांकडून तारा बदलण्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. अनेकवेळा दिवसा किंवा रात्रीची स्पार्किंग होवून तारा तुटन पडत आहेत. यामुळे जीवित हाणी होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. महावितरण विभागाचा अनागोंदी कारभार जनसामान्यांच्या जीवावर बेतणार असल्याचे दिसून येत आहे. गेल्या पंधरा दिवसापासुन गावात जिर्ण

व जुनाट तारी हे लोंबकळलेल्या अवस्थेत दिसुन येते यामुळे काही जणांना याचा फटकाही बसलेला आहे. तार तुटल्यावर केव्हा तार जोडली जाईल याची काहीच शाश्वती महावीतरन कडून देण्यात येत नाही कधीकधी रात्र व दीवसाही तारी तुटतात यामुळे लाईट जाण्याचे प्रकार वाढले आहे.उमापूर महावीतरणच्या बीजेच्या तारी हे जुनाट व जीर्ण असल्याने लोंबकळलेले आहे त्यामुळे दिवसा व रात्री अपरात्री तारी तुटण्याचे प्रकार वाढले आहे. त्यामुळे रात्र दिवस अंधारात काढावे लागत आहे. दिवसा व रात्री कधीही तारी एकमेकांना स्पर्ष करून ठीणग्या उडून



तारी तुटत आहे उमापूर मध्ये संपूर्ण गावातच महावितरणच्या तारी अतिशय जीर्ण झालेल्या आहेत. काही जुने वृद्ध माणसं सांगत आहेत की १९७२ सारी उमापूर मध्ये तारी व पोलचे काम झालेले आहे तेव्हापासून या तारी बदलण्यात आलेले नाहीत अतिशय जीर्ण अवस्थेत तारी असून दिवसा रात्री

कधीही या तारी एकमेकांना चिटकून मोठा फटाका फोडल्यासारखे चिंगार्या उडत आहेत. या चिंगार्यामुळे बस स्थानक ते हनुमान मंदिर परिसरात व्यापार पेठ आहे या व्यापार पेठेत दुकाने थाटली आहेत याचं परीसरात गत पंधरा ते वीस दिवसापासून सतत तारीला तार चिटकून चीगारे उडत असल्याने खाली असलेल्या दुकान ची हानी होण्याची शक्यता आहे. यामुळे या परिसरातील व्यापार्यांनी या तारी बदलण्याची मागणी केली आहे.

# सामान्य जनतेत काम करणाऱ्यांना पक्ष संघटनेत प्राधान्य देवू - अमरसिंह पंडित

## जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण यांच्या उपस्थितीत गेवराईत सदस्य नोंदणीचा शुभारंभ

प्रतिनिधी । गेवराई

**विधानसभेतील विजयामुळे कार्य पद्धतीत बदल होणार नाही, भविष्यातही जमीनीवर राहुन काम करत राहु, राजकीय गट-तट न पाहता सर्वसमावेशक विकास कामे करुन सामान्यांना दिलासा देण्याचे काम आपण सर्वांनी करणे गरजेचे आहे. पक्ष संघटनेतील पदाधिकाऱ्यांची निवड करताना सामान्य जनतेत काम करणाऱ्यांना पक्ष संघटनेत प्राधान्य देवून असे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांनी सांगितले. मराठवाडा विभागात सर्वाधिक सदस्य नोंदणी गेवराई मध्ये होईल असा विश्वास जिल्हाध्यक्ष ड. राजेश्वर चव्हाण यांनी व्यक्त केला. गेवराई येथे आयोजित सदस्य नोंदणी अभियान व पदाधिकारी मेळाव्यात ते बोलत होते. आमदार म्हणुन पहिल्या शंभर दिवसात आ.विजयसिंह पंडित यांनी केलेल्या कामांचा लेखा-जोखा यावेळी अमरसिंह पंडित यांनी उपस्थितांसमोर मांडला. मेळाव्याला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने सदस्य नोंदणी अभियान व पदाधिकारी मेळाव्याचे गेवराई येथे शनिवार दि. १५ रोजी आयोजन करण्यात आले होते. यावेळी राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित, जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, जयभवानीचे व्हा. चेअरमन भाऊसाहेब नाटकर, बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण, खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष जयदिप औटी, बीड बाजार समितीचे उपसभापती शामराव पडुळे, जिल्हा बँकेचे माजी संचालक दशरथ वनवे, सरपंच संघटनेचे कालिदास नवले, माजलगांव चे माजी सभापती भागवत खुळे, भवानी बँकेचे व्हा. चेअरमन अब्दुल हन्नान, आनंद सरपते, शितलताई धोंडरे, मुक्ताताई आर्दड यांच्यासह मान्यवर



व्यासपिठावर उपस्थित होते. या प्रसंगी भाऊसाहेब नाटकर यांनी प्रास्ताविक केले तर गजानन काळे, गणेश सावंत, कालिदास नवले, समीर सय्यद, आनंद सरपते यांनी मनोगत व्यक्त केले.आ. विजयसिंह पंडित यांनी आमदार म्हणुन पहिल्या शंभर दिवसात पी.एम. किसान योजनेतील ३,१०० लाभार्थ्यांना लाभ मिळवुन दिला, २२,१८० एपीएल शिधापत्रिका धारकांना २ कोटी ७८ लाख रुपयांचा लाभ मिळवुन दिला. दिव्यांगांसाठी प्रत्येक महिण्याच्या पहिल्या शनिवारी एक दिवसाचे दिव्यांग बोर्ड उपजिल्हा रुग्णालय, गेवराई येथे आयोजित करण्याचा निर्णय केला. उपजिल्हा रुग्णालयात डायलेसिस युनिट, एक्सरे आणि सोनोग्राफी मशिन कार्यान्वीत केल्या. पी.एम. कुसूम योजनेतील प्रलंबित १३० सौर कृषीपंप अस्थापित करुन दिले. गेवराई आगारासाठी नविन बसेस, सिंदफणा नदीवरील टाकळगांव बॅरेज, न्यायालयाच्या विस्तारित इमारत बांधकामासाठी पाठपुरावा, गेवराई शहरातील पाणी पुरवठा योजना आणि रुग्णलयासाठी एक्सप्रेस फिडर, अतिक्रमण धारकांचा हक्काचा पीटीआर आदी विकास कामे करण्यासाठी पाठपुरावा सुरु केल्याबाबतचा लेखा-जोखा माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी यावेळी उपस्थितांसमोर मांडला.

सर्वसामान्य जनतेत जावुन काम करणाऱ्यांना पक्ष संघटनेतील पदे देतांना प्राधान्य मिळेल, सर्वांना विश्वासात घेवुन काम करणाऱ्यांना संधी देवु, विकास कामांसाठी निधी वितरीत करतांना ग्रामपंचायतीला विश्वासात घेवु, पक्ष संघटना अधिक मजबुत करण्यासाठी सर्वांनी पुढे येवुन काम करण्याची गरज आहे. पक्षात नव्याने आलेल्या कार्यकर्त्यांचा सुद्धा सन्मान होईल असा विश्वास या निमित्ताने प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांनी व्यक्त केला. सदस्य नोंदणी अभियान केवळ सदस्य वाढीपुरते मर्यादित न राहता भविष्यात सक्षम नेतृत्व घडविण्यासाठी आणि जनसामान्यांपर्यंत पक्षाच्या धोरणांचा प्रचार करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे असे प्रतिपादन जिल्हाध्यक्ष ड.राजेश्वर चव्हाण यांनी केले. गेवराई येथे आयोजित राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सदस्य नोंदणी अभियान प्रसंगी ते बोलत होते. शितलताई धोंडरे यांनी आभार व्यक्त केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शंभर कुटूंबांना जीवनावश्यक वस्तुंचे वितरण

प्रतिनिधी । अंबाजोगाई

जनसहयोगच्या वतीने लोकसहभागातून शंभर वयोवृद्ध कुटुंबांना जीवनावश्यक वस्तुचे शनिवारी १५ फेब्रुवारी रोजी दुपारी वितरण करण्यात आले. यावेळी डॉ.सिध्देश्वर बिराजदार,डॉ.सुनिता बिराजदार,कल्पना लोहिया,भागवत कांबळे, अरुण आसरडोहकर आदी उपस्थित होते.यावेळी बोलताना डॉ.बिराजदार म्हणाले की,डॉ. व्दारकादासजी लोहिया असताना धान्य वितरणावेळी होतो तेव्हा त्यांनी म्हटले होते की, तीस,पस्तीस जणांना किराणा वितरण होत आहे, परंतु पुढील काळात मी असेन नसेन



शंभर पर्यंत लोकांना धान्य किराणा वितरण होईल त्यावेळी बाबुजी बोलले ते आज सत्य रुपात आले त्यामुळे मी समाधानी आहे. माझ्या कडून या उपक्रमासाठी अर्थसहाय्य राहील असे सांगितले.कल्पना लोहिया म्हणाल्या की, ज्यांना आधार नाही त्यांचा उदरनिर्वाह भागविण्या साठी मानवलोकने पुढाकार घेऊन लोकसहभागातून दर महिन्याला जीवनावश्यक वस्तुंचे वितरण केले जाते.जे भरघोस मदत करतात त्यांच्यामुळे हा उपक्रम सुरू आहे असे त्या म्हणाल्या. शाम सरवदे यांनी प्रास्तविक केले यावेळी संजना आपेट, सावित्री सगरे यांच्यासह इतर उपस्थित

# मराठी शाळा जगल्या तरच अभिजीत भाषेला महत्त्व

## सरकारमधील किती लोकांना अभिजीत भाषा म्हणजे काय याची माहिती आहे

### शिवसेना तालुकाप्रमुख सोपान काका मोरे
### शिवसेना उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर

प्रतिनिधी । शिरूर कासार

अभिजीत भाषेचा शृंगार घातला म्हणजे ती टिकतेच असे नाही त्यासाठी टिकवणारे विद्यार्थी शिक्षक आणि शाळा जगल्या पाहिजेत तरच त्या अभिजीत भाषेला महत्त्व आहे अन्यथा ती वांजवटी ठरते म्हणून राज्यातील मराठी शाळा टिकणे गरजेचे आहे परंतु आज त्या शाळाच अखेरची घटका मोजत आहेत म्हणून त्या शाळा टिकवणे त्या शाळांचा दर्जा सुधारणे हे राज्य व केंद्र सरकारची जबाबदारी आहे त्यासाठी सर्वकष प्रयत्नाची गरज आहे अन्यथा मराठी भाषेला कोणताही दर्जा देऊन तिची मुसकटदाबी होत असेल तर ती न दिलेलीच बरी असे रोखठोक शिवसेना तालुकाप्रमुख सोपान काका मोरे यांचे मत आहे शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर म्हणाले की मराठीला अभिजीत भाषेचा दर्जा दिला म्हणून केंद्र राज्य सरकार गाजावाजा करते मात्र सरकारमधील किती लोकांना अभिजीत भाषा म्हणजे काय याची माहिती आहे हा गंभीर प्रश्न आहे अभिजीत भाषेचा दर्जा मिळाला म्हणून भाषेचा विकास होत नाही याकरिता शासनाला मनापासून माय मराठीच्या विकासासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे पण तसे होताना दिसत नाही असे शिवसेना तालुकाप्रमुख सोपान काका मोरे म्हणाले की कारण राज्यातील मराठी भाषेच्या शाळांची आज अत्यंत दयनीय अवस्था आहे हे फक्त सरकारला मराठी शाळा बंद करायच्या आहे असेच दिसून येते कारण याकरिता शाळा महाविद्यालयांना जगवण्यासाठी शासनाला अनुदान द्यावे लागते मराठी शाळात जर बंद पडल्या तर खर्चाचा विषयच नाही पर्यायाने मराठी भाषेचा विकास कसा होईल असा प्रश्नही



मोरे काका यांनी उपस्थित करत म्हणाले की अभिजीत भाषा दर्जा मिळाला म्हणून केंद्र सरकारकडून ३०० कोटींचा निधी भाषा विकासासाठी मिळेल या ब्रह्मात राज्य सरकार आहे मात्र आतापर्यंत केंद्र सरकारने ज्या ज्या भाषांना अभिजात भाषेचा दर्जा दिला त्या भाषांना किती निधी दिला याचा विचारही होणे गरजेचे आहे मात्र यासाठी राज्य शासनाने निधी देणे गरजेचे आहे तसेच यापुढे जूनच्या अगोदर शिक्षणमंत्र्याकडे निवेदनाद्वारे भेटून चर्चा करून इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत अखंड हिंदुस्तानाचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज स्वराज्य रक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जिजाऊ मासाहेब यांचा इतिहास शिकवण फार गरजेचे आहे व ते पुढे कंटिन्यू महाराजांचा इतिहास शालेय पाठ्यपुस्तकात असणं फार गरजेचे आहे त्याचा कुठेतरी महाराष्ट्र म्हणून आपल्याला विसर पडला आहे का? हेही लक्षात आणून देणे फार गरजेचे आहे छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास शिकवण्यासाठी वेळ पडल्यास रस्त्यावर देखील उतरायची वेळ आली तरी शिवसेना उद्धवजी बाळासाहेब ठाकरे या पक्षाच्या वतीने शंभर टक्के येणाऱ्या काळामध्ये रस्त्यावर शिवसैनिकांसह मोठ्या संख्येने उतरून छत्रपती शिवाजी महाराज छत्रपती संभाजी महाराज यांचा इतिहास शालेय पाठ्यपुस्तकांमध्ये शिकवलाच गेला पाहिजे जय महाराष्ट्र



# होळमध्ये भगवान बाबा वारकरी संस्थेचा पाया मधुकर महाराज खाडे यांनी रचला

## ह.भ.प.महादेव महाराज बोराडे यांचे प्रतिपादन; होळ येथे किर्तन सोहळा

प्रतिनिधी । केज

मधुकर महाराज खाडे यांचे कार्य राजकीय क्षेत्र, कुस्तीसोबत वारकऱ्यांच्या आखाड्यातही होते. त्यांनी अनेक वारकरी, पैलवान घडवले असून होळ येथील भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचा पाया रचला. त्यांच्यामुळे परिसरातही वारकरी संस्था निर्माण झाल्या, त्यांचा आग्रह नसता तर संस्था उभ्या राहिल्या नसत्या. संस्थापक सचिव असूनही त्यांनी एखाद्या सेवेकऱ्याप्रमाणे आयुष्यभर सेवा केली, असे प्रतिपादन औरंगपूर (ता.केज) येथील श्री.जगद्गुरु तुकोबाराय पावनधाम संस्थानचे महंत ह.भ.प. महादेव महाराज बोराडे शास्त्री यांनी व्यक्त केले.

वै.पै.मधुकर महाराज खाडे यांचे दि.६ फेब्रुवारी रोजी अपघाती निधन झाले. त्यानिमित्ताने केज तालुक्यातील होळ येथील श्री संत भगवान बाबा मंदिरात दि.१३ ते १९ फेब्रुवारी दरम्यान किर्तन सप्ताह आयोजित केला आहे. ह.भ.प. महादेव महाराज बोराडे शास्त्री हे शनिवारी (दि.१४) किर्तन सेवेप्रसंगी बोलत होते. यावेळी होळ येथील संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प.डॉ.प्रल्हाद महाराज ढाकणे शास्त्री, पुणे येथील संगीत क्षेत्रातील विद्यावाचस्पती ह.भ.प.प्रा. गणेश महाराज भगत, पावनधाम संस्थानचे सचिव ह.भ.प.अमोल महाराज जाधव, ह.भ.प.विष्णू महाराज गुळभिले, मृदंगाचार्य राम महाराज निकम, गायनाचार्य हर्षद महाराज दसवडकर यांची उपस्थिती होती.

महादेव महाराज बोराडे यांनी किर्तन सेवेसाठी संत तुकाराम महाराज यांचा देह तंव असे भोगाचे अधीन । याचे सुख सीण क्षणभंगुर ।।१।। अविनाश जोडी देवापायी भाव । कल्याणाचा ठाव सकळही ।।ध्रु.।। क्षणभंगुर हा तेथील पसारा । आलिया हाकारा अवघे नासे ।।२।। तुका म्हणे येथे सकळ विश्रांति । आठवावा चित्ती नारायण ।।३।। हा अभंग घेतला होता. बोराडे महाराज म्हणाले, संत तुकाराम महाराज यांनी उपदेश दिला आहे. त्यांनी म्हटले की, शब्दाची किमया महत्वाची नसते, शब्द कुणाच्या मुखातून निघतो याला अनन्यसाधारण महत्व असते. शब्दामध्ये सामर्थ्य आहे, त्यांचाच उपदेश ऐकावा. समाजाला दिशा दाखविण्यासाठी देवाने संतांना पाठवले. देह हा दुर्लभ आहे. देहाचे सामर्थ्य कळले तो व्यक्ती समर्थ होतो. व्यक्तीकडे अल्पवेळ आहे, मात्र वेळ भरवशाचा नाही. कधीकधी घास मुखात जाईल, इतका श्वास मिळत नाही. हा देह नश्वर आहे, हा विचार आचरणात आणून खाडे महाराजांनी अहोरात्र सेवा केली, असे सांगून श्रद्धांजली अर्पण केली. माणूस जिवंत असताना किंमत कळत नाही हे आपले दुर्दैव आहे. समाजसेविका सिंधुताई सपकाळ यांनी म्हटल्याप्रमाणे मोठे होण्यासाठी मरावे लागते. अगदी तसेच वै.पै.मधुकर महाराज खाडे हे न कळलेले आणि अजातशत्रू व्यक्तीमत्व होते. त्यांचा राग-लोभ विसरून पुढे जाण्याचा गुण अनुकरणीय आहे. पावनधाम संस्थानवर त्यांचे येणे विशेष होते. गतवर्षीच्या आयोजित धोंडे जेवण समारंभात नामवंत किर्तनकारांमध्ये खाडे महाराजांचा संस्थानकडून सन्मान केला, याचा मनस्वी आनंद आहे, असे बोराडे महाराज यांनी म्हटले. यावेळी ग्रामस्थ, होळ येथील संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्था, औरंगपूर येथील पावनधाम संस्थानचे पदाधिकारी, आजी-माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वामी योगीराज महाराजांचा साधनेचा प्रकाश :- रामगडाचे तेजस्वी पुनरुत्थान

प्रतिनिधी । बीड

मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात वसलेला श्री क्षेत्र रामगड थोरला गड केवळ ऐतिहासिक व धार्मिक दृष्टिकोनातून महत्त्वाचा नाही, तर सध्याच्या काळात हा एक पुनरुज्जीवित आध्यात्मिक केंद्र बनत आहे. स्वामी योगीराज महाराज रामगडकर यांच्या अथक परिश्रमाने या स्थळी नवचैतन्य निर्माण झाले आहे. या ठिकाणी आता हजारो भाविकांची वर्दळ वाढली आहे. नियमित कीर्तन सेवा, हे टायटल हरिनाम सप्ताह, रामनवमी उत्सव, वनसंवर्धन अभियान, सामाजिक व आध्यात्मिक चळवळी आदी उपक्रमांमुळे श्री क्षेत्र रामगड संपूर्ण महाराष्ट्रासाठी श्रद्धेचे आणि भक्तीचे केंद्र बनले आहे.

गादीचा इतिहास व महंत परंपरा:- श्री क्षेत्र रामगड गादीवर आतापर्यंत पाच महंत होऊन गेले. या गडाचे प्रथम महंत गुरुवर्य हभ.प.श्री रामबाबा हनुमान भक्त म्हणून त्याकाळी त्यांची ख्याती होती नित्यक्रम त्यांचा बारा गावच्या बारा हनुमान मंदिरांना गोदावरीचे पाणी आणून अभिषेक करत असत. महंत गुरुवर्य ह.भ.प.गोपाळ बाबा, महंत गुरुवर्य ह.भ.प.यसुबाबा, गुरुवर्य ह.भ.प महंत किसनबाबा,महंत ह.भ.प.लक्ष्मण बाबा या सर्व महनतांच्या समाधी या गडावरच आहेत. कोविड-१९ च्या कठीण काळात ह.भ.प श्री लक्ष्मण महाराज यांचे निधन झाले, त्यानंतर ह.भ.प.पु.गुरुवर्य स्वामी योगीराज महाराज यांना या गादीचे वारसदार म्हणून प्रतिष्ठापित करण्यात आले.जेव्हा स्वामी योगीराज महाराज येथे आले, तेव्हा भाविकांची वर्दळ नव्हती.उत्सव व कीर्तन सेवा असे उत्सवाचे कार्यक्रम कमी प्रमाणात व्हायचे कारण ह भ प गुरुवर्य लक्ष्मण महाराज यांना या गडावर बराच संघर्ष करावा लागला या



ठिकाणची परिस्थिती नैसर्गिक स्थिती या सर्व गोष्टी कारणीभूत होत्या.प्यायला पाणी नव्हते, तसेच गडावर उपासमारीची स्थिती होती.केवळ दोन-तीन गाई आणि काही पाळीव प्राणी होते.कोविडच्या भीषण परिस्थितीत येथे ना खायला अन्न होते, ना प्राण्यांना पाणी.अशा परिस्थितीत गादी स्वीकारल्यानंतर स्वामी योगीराज महाराजांनी या गडाचा पुनरुत्थान करण्याचा निश्चय केला.

श्री क्षेत्र रामगडचा आध्यात्मिक व धार्मिक पुनरुत्थान:-स्वामी योगीराज महाराज यांच्या अथक प्रयत्नांमुळे आज श्री क्षेत्र रामगड हे एक प्रमुख आध्यात्मिक केंद्र बनले आहे.नियमित भजन व कीर्तन सेवा दर एकादशीला कीर्तन व महाप्रसाद सेवा केली जाते.उपवासाच्या दिवशी भाविकांसाठी फराळ सेवा ठेवली जाते.हरिनाम सप्ताह, अखंड हरिपाठ व भजनी मंडळे स्थापन करण्यात आली आहेत.

रामनवमी उत्सव - महाराष्ट्रातील सर्वांत मोठ्या उत्सवांपैकी एक रामनवमी उत्सव आहे, दरवर्षी तीन ते चार लाख भाविक येथे रामनवमीसाठी येतात.पन्नास ते साठ हजार भाविक रोज कीर्तनाला उपस्थित राहतात.फिरता नारळी अखंड सप्ताह व संगीत राम कथा यावर्षी ४६ वा सप्ताह रामगडावरच साजरा होणार आहे. बऱ्याच वर्षापासून हा सप्ताह गडावरच साजरा होत आहे. यापूर्वी वेगवेगळ्या गावांमध्ये हा नारळी सप्ताह साजरा होत असे परंतु अलीकडे हा नारळी सप्ताह व त्याचे स्वरूप फार मोठे झाल्यामुळे गडावरच साजरा होत आहे. महाराष्ट्रातील सर्वांत मोठ्या सप्ताहांपैकी एक आहे.

६०-७० गावांमध्ये आध्यात्मिक जागृती अभियान:-भजनी मंडळे स्थापन करणे.अखंड हरिनाम सप्ताह चालवणे.व्यसनमुक्ती अभियान राबवणे.आध्यात्मिक ज्ञानाच्या माध्यमातून नागरिकांचे जीवन सुखकर करण्यासाठी उपक्रम राबवणे.स्वामी योगीराज महाराज केवळ ३-४ तास झोप घेतात आणि उर्वरित वेळ हा गडाच्या सेवेसाठी वाहून घेतात. श्री क्षेत्र रामगड व वनसंवर्धन चळवळ:-श्री क्षेत्र रामगड नैसर्गिकदृष्ट्या कातळखडकाने व्यापलेला आहे.भूगर्भशास्त्रज्ञांच्या मते, या ठिकाणी वनस्पती संवर्धन करणे अत्यंत कठीण आहे.परंतु, स्वामी योगीराज महाराज यांनी जिद्द न सोडता गडावर दुर्मिळ झाडांची लागवड केली आहे.

गडावर रोपलेली दुर्मिळ वृक्षसंपदा: रुद्राक्ष, नारळ(कल्प वृक्ष), कैलासपती, अर्जुन, फणस,आंबा,चिकू, कांचन,वड ,पिंपळ, कदंब,जांभूळ,पेरू,भारतीय ख्रिसमस झाड , उंबर, चिंच,भोकर,कन्हेर,सीताफळ,रामफळ,सीता अशोक पंचवटी स्थापन: - पवित्र वृक्षांची एकत्र लागवड:-पौराणिक मान्यतेनुसार, पंचवटीमध्ये वड, पिंपळ, आंवळा, बेल आणि अशोक ही झाडे असणे आवश्यक आहे.ही परंपरा श्री क्षेत्र रामगडवर पुन्हा जिवंत करण्यात आली आहे.

गडाचा निसर्गरम्य कायापालट:- जलसंधारणाचे विविध उपक्रम हाती घेतले गेले.गडावर पाणीपुरवठा व्यवस्था निर्माण केली.पर्यावरणपूरक उपाययोजना करून गडावर हरितक्रांती घडवली. सामाजिक आणि आध्यात्मिक परिवर्तनाचे कार्य:- स्वामी योगीराज महाराज फक्त धार्मिक कार्यापुरतेच मर्यादित नाहीत.त्यांनी सामाजिक सुधारणा आणि आध्यात्मिक जागृतीसाठी पुढाकार घेतला आहे.१) व्यसनमुक्ती अभियान:-गडाच्या परिसरातील गावांमध्ये व्यसनमुक्तीवर प्रवचन.तंबाखू, दारू, गांजा, सिगारेट या व्यसनांपासून लोकांना परावृत्त करणे.२) हरिनाम सप्ताह: - संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध उपक्रम संपूर्ण गडावर हरिनामाचा अखंड गजर सुरू ठेवणे.

**गडावरील कार्यक्रमात सर्व जाती-धर्मांचे लोक सहभागी होत आहेत.धार्मिक उत्सवांमध्ये सर्व समाजघटकांना एकत्र आणून सामंजस्य वाढवणे.स्वामी योगीराज महाराजांचे प्रेरणादायी कार्य स्वामी योगीराज महाराज रामगडकर यांनी अल्पकालावधीत श्री क्षेत्र रामगडचा पुनरुत्थान करण्याचा ध्यास घेतला.या गादीला नवीन ऊर्जेने पुनरुज्जीवित केले.मोठ्या प्रमाणावर भाविकांना जोडले.वनसंवर्धन, जलसंवर्धन व पर्यावरणपूरक प्रकल्प राबवले:-आध्यात्मिक ज्ञानाचा प्रसार करत सामाजिक सुधारणा घडवून आणल्या या यज्ञाचे कार्य अविरत चालू आहे.श्रीरामचंद्राची महती अखंड राहो! जय श्रीराम!आपण श्री क्षेत्र रामगडला भेट देवून भक्ती, पर्यावरण व आध्यात्मिक वारशाचा अनुभव घ्या.**
**लेखन- प्रा.डॉ.अरुण दैतकार पाटील**
**श्री बंकटस्वामी महाविद्यालय, बीड.**

# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची जिल्हा कार्यकारणी बरखास्त - राजेंद्र मस्के

## नव्या जुन्या कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन नव्याने पदाधिकारी निवड करण्यात येणार - खा.बजरंग बप्पा सोनवणे

## बीड जिल्हा पुरोगामी विचाराचा जिल्हा आहे नेहमीच शरदचंद्रजी पवार साहेबांना साथ देण्याचे काम केले- आ.सदीप क्षीरसागर

**प्रतिनिधी ।** बीड

काल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाची जिल्हा कार्यकारिणीची बैठक संपन्न झाली.या बैठकीत खासदार बजरंग बप्पा सोनवणे,आमदार संदीप भैया शिरसागर व जिल्ह्यातील आजी माझी आमदार,ज्येष्ठ नेते,पदाधिकारी,मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीला मेळाव्याचे स्वरूप आले होते.

यावेळी नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांचा सत्कार करण्यात आला व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आले.यावेळी आमदार संदीप क्षीरसागर यांनी पक्ष फुटीच्या नंतर देशाचे नेते शरदचंद्रजी पवार साहेब यांना साथ देण्याचे काम केले व आमदार असताना पक्षाच्या जिल्हाध्यक्ष पदाची धुरा सांभाळली,त्यांनी आपल्या भाषणात असे सांगितले की मी आमदार झाल्यानंतर जेवढे माझे सत्कार झाले नाहीत तेवढे जिल्हाध्यक्ष झाल्यानंतर माझे सत्कार झाले आहेत.बीड जिल्हा पुरोगामी विचाराचा जिल्हा आहे नेहमीच शरदचंद्रजी पवार साहेबांना साथ देण्याचे काम केले आहे,असे उद्गार संदीप क्षीरसागर यांनी व्यक्त केले,

यावेळी जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी मला पक्षाने जिल्हाध्यक्ष जबाबदारी दिली आहे, मी ती सार्थपणे निभावणार आहे नव्या जुन्या कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन नव्याने जिल्हा कार्यकारणीची निवड करण्यात येणार आहे व जुनी कार्यकारणी बरखास्त झाल्याची घोषणा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केली आहे,ज्या कार्यकर्त्यांनी निष्ठेने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे काम करत आहे अशा कार्यकर्त्यांना पदाधिकारी म्हणून संधी देण्याचे व्यक्त केली,यावेळी खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी आपल्या समारोपीय भाषणात असे म्हणाले की माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याला बीड जिल्ह्याचा खासदार म्हणून संधी देण्याचे काम पक्षाने केले आहे,काम करणाऱ्या कार्यकर्त्याला संधी मिळत असते येणाऱ्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत कार्यकर्त्यांना पक्ष संधी देणार आहे,त्या संधीचं सोनं करण्याचे काम कार्यकर्ते नक्कीच करतीलजिल्हाध्यक्ष यांनी नवीन जिल्हा कार्यकारणी तालुकाध्यक्ष निवड व विविध पक्षाच्या सेलचे अध्यक्ष निवडावेत असे आव्हान खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी कार्यकर्ता बैठकीत व्यक्त केले.यावेळी राष्ट्रवादी युवक चे प्रदेशाध्यक्ष मेहबूब भाई शेख,राष्ट्रवादी उपाध्यक्ष अँड नर्सिंग जाधव,माजी आमदार उषाताई दराडे,सय्यद सलीम भाई,पृथ्वीराज साठे,संगीताताई ठोंबरे,ज्येष्ठ नेते डि.बी.बागल,मोहनराव जगताप, राजेसाहेब देशमुख, वैजनाथराव तांदळे, बाळासाहेब नागरे, बाळासाहेब गोरे,पवन तांदळे, संजीवनी देशमुख, विद्याताई जाधव, के के वडमारे,हेमाताई पिंपळे, कुंदन काळे, श्रीराम मुंडे, महादेव जमाले, समदभाई, शेख मोमीन, दीपक हजारे, झुंजार धांडे, मधुकर काशीद, अनिल जवकर, बाळासाहेब राऊत, राम खाडे, परमेश्वर शेळके, शंकर जाधव, जीवन देशमुख, दीपक खोले, नारायण डक, युवराज लगड, सूर्यकांत गोरे, सोमनाथराव माने, पंकज धांडे, बद्रीनाथ जटाळ, लाला पन्हाळे, अनिल शेळके, शफिक पेंटर,शेख जमीलभाई,शफिक काजी, शाम कोठुळे सह अधिक कार्यकर्ते उपस्थित होते,



# अविनाश क्षीरसागर आत्महत्या प्रकरणात गुन्हा दाखल

## आरोपीस तात्काळ अटक करा अन्यथा पिडीत कुटुंबासह आंदोलन - दत्ता कांबळे

**प्रतिनिधी ।** माजलगांव

मयत अविनाश क्षीरसागर या ऊसतोड मजुराने मुकादमाच्या जाचास कंटाळून आत्महत्या केल्याचा प्रकार काल ता. १४ रोजी सिरसाळा पोलीस स्टेशन हद्दीत घटना घडली होती.सदरील घटनेत दोन दिवस उलटूनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नव्हती. आंबेडकरी चळवळीतील सामाजिक कार्यकर्ते दत्ता कांबळे यांनी अभ्यासपूर्ण सातत्याने पाठपुरावा करून शेवटी आत्महत्यास प्रवृत्त करणे सह अनु. जाती अनु. जमाती प्रतिबंधत्मक कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करून घेतला. सदरील प्रकरणात गुन्हा दाखल होतच काँग्रेस अनु. जाती विभागचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी आरोपीना तात्काळ अटक करण्यात यावी अन्यथा पिडीत कुटुंबासह तीव्र आंदोलन करू असा इशारा दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे प्रशासनास दिला आहे. सदरील घटनेत सुधारित कायद्या अंतर्गत कलम १०८, ११५(२), ३५२, व अनु. जाती अनु. जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम ३(२), ३(ीं), ३(१)(ी) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास करण्यास सुरुवात झाली आहे. सदरील प्रकरणात काँग्रेस नेते दत्ता कांबळे सह, राजेभाऊ खंडागळे, धम्मानणंद साळवे, अनिल कांबळे सह कार्यकर्त्यांनी गुन्हा दाखल करण्यासाठी प्रयत्न केले.





बीड (प्रतिनिधी) बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय चंपावती महोत्सवात तुलसी इंग्लिश स्कूल, संत ज्ञानेश्वर नगर, बीड. च्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. जिल्हास्तरीय चंपावती महोत्सवाच्या वतीने चित्रकला, समूह नृत्य, वैयक्तिक नृत्य, जोडी नृत्य, समूहगीत गायन, रांगोळी आधी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. तुलसी इंग्लिश स्कूल बीड येथील विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवून सोलो डान्स स्पर्धा (वर्ग १ ली ते ३ गट) मध्ये इयत्ता ३ री मधील विद्यार्थिनी कु. अनघा काळे प्रथम क्रमांकाने विजेती ठरली, तर जोडी नृत्या मध्ये कु .जान्हवी महांवर आणि कु.भूमी महांवर या द्वितीय क्रमांकाने विजेत्या ठरल्या. वयक्तिक गीतगायन स्पर्धा मध्ये , कु. जान्हवी महानवर हिने द्वितीय क्रमांक मिळवला,तर पृथ्वीराज पौळ या विद्यार्थ्याने वैयक्तिक नृत्य मध्ये तिसरा क्रमांक मिळविला.

# मातंग समाज कृती समिती सोलापूर शहर जिल्हा यांच्यावतीने यशस्वी झालेल्या विध्यार्थ्यांचा सत्कार संपन्न


**प्रतिनिधी ।** सोलापुर

मातंग समाज कृती समिती सोलापूर शहर जिल्हा यांच्या वतीने एमपीएससी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रम मा रमेश बोराडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला..कु सरोजणी ज्योतीराम भोजने चझडउ उत्तीर्ण (सोलापूर)कु संजीवनी ज्योतीराम भोजने चझडउ उत्तीर्ण (सोलापूर) मुकुंद बाळासाहेब होळकर

चझडउ उत्तीर्ण एकरुख ता.उत्तर सोलापूर विजया नारायणकर मार्डी ता.उत्तर सोलापूर विद्यापीठ स्तरीय अविष्कार संशोधन महोत्सव २०२४ यामध्ये द्वितीय क्रमांक मिळवला.. या सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा फेटा पंचशील उपरने व भारतीय संविधानाचे उद्देशिका देऊन सौ राधा शंकर भोसले यांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला..तसेच मातंग समाज समिती पदाधिकाऱ्यांच्या हस्ते उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या पालकांचाही फेटा बांधून सत्कार करण्यात आला... या कार्यक्रमावेळी मा युवराज पवार व रवीं शैलेश पोटफोडे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत आपले मनोगत व्यक्त केले *चझडउ उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले कि मातंग समाज कृती समिती सोलापूर शहर जिल्हा यांनी आम्हाला बोलवून आमचा सत्कार केला त्याबद्दल आम्ही समितीचे ऋणी आहोत असे म्हणाले. मा राजू क्षीरसागर यांनी या कार्यक्रमाचे आभार व्यक्त केले..यावेळी उपस्थित मा श्रीकांत देडे मा प्रभाकर कांबळे मा मसुदेव रणदिवे मा आदिनाथ उडानशिवे मा विकी पवार मा महेश जाधव मा रमेश पाटोळे मा शंकर भोसले मा शिवाजी गायकवाडव मा हिरा आडगळे मा महेश भालेराव आदी उपस्थित होते



# महाकुंभमध्ये चेंगराचेंगरी अन् अग्नितांडवाचा कलंक सुरुच





## २८ दिवसांत चौथ्यांदा आगीचे रौद्ररुप, तंबू जळाले, नोटांच्या दोन बॅगा जळून खाक

नवी दिल्ली : महाकुंभमध्ये भीषण आगीचा आणि चेंगराचेंगरीचा कलंक सुरुच असून काल (१५ फेब्रुवारी) नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर शनिवारी रात्री साडे नऊच्या सुमारास झालेल्या चेंगराचेंगरीत १७ जणांचा मृत्यू झाला, त्यात ३ मुलांचा समावेश आहे. तर १० हून अधिक जण जखमी झाले आहेत. एएनआयने दिलेल्या माहितीनुसार, ट्रेनचा प्लॅटफॉर्म बदलण्याच्या घोषणेनंतर प्रचंड गर्दीत चेंगराचेंगरी झाली. ट्रेन प्लॅटफॉर्म १२ वरून १६ वर हलवण्यात आली. दरम्यान, प्लॅटफॉर्म १६ च्या दिशेने जाण्यासाठी लोक फूटओव्हरवरून धावू लागले आणि चेंगराचेंगरी झाली. त्याचवेळी, काही मीडिया रिपोर्ट्समध्ये प्लॅटफॉर्म क्रमांक १३ आणि १४ वर गर्दीमुळे हा अपघात झाल्याचे सांगण्यात आले. महाकुंभला जाणाऱ्या २ गाड्या उशिरा आल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे गर्दी वाढली आणि चेंगराचेंगरी झाली.

दिल्लीचे नायब राज्यपाल व्हीके सक्सेना यांनी ट्विट करून या घटनेवर शोक व्यक्त केला. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी या घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. तथापि, यापूर्वी उत्तर रेल्वेच्या सीपीआरओ (मुख्य जनसंपर्क अधिकारी) यांनी चेंगराचेंगरी झाल्याचा इन्कार केला होता. कोणतीही चेंगराचेंगरी झाली नसून ती केवळ अफवा असल्याचे त्यांनी सांगितले होते.

# मला हलक्यात घेऊ नका : ठाकरेंना इशारा शिंदे

रत्नागिरी : महाराष्ट्रातील जनतेने तुम्हाला खोक्यात बंद करण्याचं काम केलं. ते म्हणायचे की कोण एकनाथ शिंदे, कोण रामदास कदम ? पण आम्ही कोण आहोत हे त्यांना दाखवून दिलं. त्यामुळे दाढीवाल्यांना हलक्यात घेऊ नका, असा इशारा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना दिला. शिंदे यांची आज रत्नागिरीत जाहीर सभा पार पडली. या सभेत बोलताना उपमुख्यमंत्री शिंदे यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासह महाविकास आघाडीवर जोरदार हल्लाबोल केला.

नारायण राणेंना सर्वात जास्त माहिती आहे की कुणाचे खोके कुठे आहेत? या महाराष्ट्रातील जनतेने विरोधकांना खोक्यात बंद करुन टाकलं. आता तरी खोके म्हणायचं बंद करा. पण रस्सी जळाली तरी रस्सीचा पीळ जात नाही. कोकणात शिवसेना वाढवण्यासाठी नारायण राणे आणि रामदास कदम यांनी त्या काळात खूप काम केलं. मी देखील नेहमी सांगायचो की जर पक्ष मोठा करायचा असेल तर कार्यकर्त्यांना बळ द्या, त्यांना वाढवा. मात्र, याबाबतचा अनुभव रामदास कदम यांनी घेतला. नारायण राणे यांनी देखील याचा अनुभव घेतला.शिवसेना हा पक्ष कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. आपल्या पक्षात कोणीही मालक नाही. राजाचा मुलगा राजा नाही तर जो काम करेल तो राजा बनेल असा आपला पक्ष आहे, असं म्हणत एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंवर टीका केली.



## टोलच्या धोरणात राज्यशासनाकडून सुधारणा फक्त

# ई-टॅग किंवा फस्ट टॅग धरणार ग्राह्य

पुणे ।प्रतिनिधी

राज्य शासनाने टोल वसुली संदर्भातील सार्वजनिक खासगी सहभाग धोरण २०१४ मध्ये सुधारणा केली आहे. त्यानुसार आता सर्व टोल नाक्यांवर केवळ ई टॅग किंवा फास्ट टॅगद्वारे टोल भरणे अनिवार्य केले आहे.जर टोल नाक्यावर ई टॅग किंवा फास्ट टॅग व्यतिरिक्त म्हणजे रोख स्वरुपात, डेबिट क्रेडिट कार्ड, क्युआर कोड या माध्यमाद्वारे टोल भरल्यास वाहनचालकांना त्यासाठी दुप्पट शुल्क भरावे लागणार आहे. या निर्णयाची अंमलबजावणी येत्या एक एप्रिल पासून केली जाणार आहे.

२०१९ पासून महामार्गावरील सर्व टोल नाक्यांवर टोल वसुलीसाठी फास्ट टॅग ही प्रणाली लागू करण्यात आली आहे. तर २०२१ पासून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने त्यांच्या अखत्यारीतील सर्व प्रकल्पांवर १०० टक्के टोल वसुली फास्ट टॅग प्रणाली अंतर्गत करणे अनिवार्य केले आहे.केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासनानेही खासगी करणांतर्गत प्रकल्पांवर फास्ट टॅग लागू करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.यापूर्वी वाहनांना रोखीने किंवा ऑनलाईनपद्धतीने टोल भरण्यास परवानगी होती. त्यासाठी अतिरिक्त शुल्क आकारू नये, असा नियम होता. आता शासनाने त्यामध्ये बदल करत फास्ट टॅग द्वारेच टोल भरण्याची सक्ती केली आहे.



# लाडकी बहीण योजना बंद होणार नाहीत : अजित पवार

मुंबई : महिलांचे प्रश्न सोडवण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत. लाडकी बहिण योजनवरुन आमच्यावर टीका केली जात आहे. ही योजना बंद होणार असे सांगितले जात आहे. पण येत्या आठवड्यात लाडक्या बहिणींना पैसे मिळणार असल्याचं वक्तव्य राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलं, त्यांच्या या वक्तव्यामुळं लाडक्या बहिणींना दिलासा मिळाला आहे.लाडकी बहिण योजनेबाबत अजित पवार यांना मोठं वक्तव्य केलं आहे. कालच मी ३ हजार ५०० कोटी रुपयांच्या चेकवर सही केली आहे. येत्या आठवड्यात लाडक्या बहिणींना पैसे मिळणार असल्याचे अजित पवार यांनी सांगितले आहे. एक रुपयात पिक विमा दिला मात्र त्याचे गैरप्रकार किती केले. गायरान जमीन शासकीय जमीन यावर पिक विमा काढण्यात आला आहे. कुठे फेडला हे पाप ? योजनेचा योग्य फायदा घेतला पाहिजे असंही अजित पवार म्हणाले.



जालना जिल्ह्यातील परतूरधील माजी आमदार सुरेश जेथलीया यांचा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार याच्या पक्षात प्रवेश झाला. त्यानंतर अजित पवार बोलत होते. आज परतूरचे नेते सुरेश जेथलीया राष्ट्रवादी परिवारात सामील झाल्याबद्दल मी त्यांचे स्वागत करतो. आम्ही बेरजेचे राजकारण करतोय. हा शिव शाहू आंबेडकरांचा महाराष्ट्र आहे. तीच परंपरा आपल्याला टिकवायची आहे. जातीय सलोखा टिकला पाहिजे यासाठी आपण काम केले पाहिजे असेही अजित पवार म्हणाले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात